नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - १४१ | Issue - 141 | वार गुरूवार दि. ९ ऑक्टोबर २०२५ | Blow- Thursday Date 9 October 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नवी मुंबई विमानतळ विकसित भारताचे प्रतिक : पंतप्रधान मोदी

## नवी मुंबई विमानतळाचे लोकार्पण; मान्यवरांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित नवी मुंबई विमानतळाचे लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते करण्यात आले. त्यामुळे, आता लवकरच नवी मुंबईतून विमानाचे उड्डाण होणार असून डिसेंबर महिन्यात पहिले विमान आकाशी झेप घेणार आहे. सन १९९० च्या दशकातील ह्या विमानतळाची सं कल्पना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर, मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना, विजया दशमी, कोजागिरी आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मित्रो, आज मुंबईचा गेल्या अनेक वर्षांपासूनची प्रतिक्षा संपुष्टात आली. आता मुंबईला दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळालं आहे. आशियातील सर्वात मोठे कनेक्टिव्हीटी हब म्हणून याची भविष्यात ओळख होईल, असेही मोदींनी म्हटले. तसेच, मुंबईत अंडरग्राऊंड मेट्रोचेही लोकार्पण झाले असून विकसित भारताचं हे प्रतिक असल्याचं मोदींनी म्हटलं. तसेच, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या तत्कालीन सरकारवरही टीका केली.



नरेंद्र मोदींनी पुढे बोलताना म्हटले की, मित्रांनो ही वेळ भारतीय युवकांसाठी असंख्या संधींचा क्षण आहे. मी महाराष्ट्रातील तरुणांना शुभेच्छा देतो, महाराष्ट्रातील लोकनेते दि.बा. पाटील यांचीही आठवण मी आज काढतो. त्यांचे सामाजिक जीवन, शेतकऱ्यांप्रती तळमळ आपल्यासाठी प्रेरणा आहे, असेही मोदींनी म्हटले. गेल्या ११ वर्षात भारतात वेगाने विकास होत आहे, वंदे भारत रुळावरुन धावते, हायवे आणि एक्सप्रेस नव्या शहरांना जोडत आहेत, बुलेट ट्रेनचं स्वप्न वेगाने साकार होत आहे, डोंगर-दऱ्यांमधून नवे बोगदे बनत आहेत. नवी मुंबई एअरपोर्ट हे विकसित भारताचे प्रतिक आहे, याचा आकार कमळाच्या फुलासारखा असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीवर बनलेला आहे, असे मोदींनी म्हटले.

नवी मुंबई विमानतळामुळे येते गुंतवणूक वाढेल, नवे उद्योग निर्माण होतील, रोजगार निर्माण होतील. स्वप्नांना पूर्ण करण्याची इच्छाशक्ती असल्यास रिझल्टही दिसून येतात. २०१४ मध्ये मला देशवायीसांनी संधी दिली, तेव्हा माझं स्वप्न होतं, हवाई चप्पल घालणाऱ्यानेही हवाई सफर केला पाहिजे, आज ते प्रत्यक्षात होत आहे. आज भारतात विमानतळांची संख्या १६० च्या पुढे गेली आहे. जेव्हा लहान-सहान शहरात विमानतळ बनत आहेत, तेव्हा विकासाला गती मिळते. उडान योजनेंतर्गत लाखो लोकांनी हवाई प्रवास करत आपलं स्वप्न पूर्ण केलं. सध्या, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा डोमेस्टिक एविएशन मार्केट आहे. एकट्या भारतात १००० नवे विमान बनविण्याचं काम सुरू आहे. या दशकाच्या शेवटपर्यंत भारत एक नवा एमआरओ बनले. भारत आज जगातील सर्वात तरुण देश आहे, आमची ताकद आपली युवा पिढी आहे. त्यामुळेच तरुणाईला जास्तीत जास्त रोजगार देण्याचं काम आपण करत आहोत.

राज्यात काहीजण सत्तेसाठी काम करतात, घोटाळे करुन विकासकामांना ब्रेक लावत आहेत. आज ज्या मेट्रो लाईनचे लोकार्पण झाले, ते याच लोकांच्या कामाची आठवण करुन देतो. इथं काही काळासाठी एक सरकार आले, त्यांनी हे काम थांबवले, आता २ तासांचा प्रवास अवघ्या ३०-४० मिनिटांत होईल. पण, काहींना हे काम २-३ वर्षे थांबवलं हे कुठल्याही पापापेक्षा कमी नाही, असे म्हणत मोदींनी नाव न घेता उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वातील महाविकास आघाडी सरकारवर निशाणा साधला. तसेच, मुंबईतील २६/११ च्या हल्ल्याचा उल्लेख करत मोदींनी काँग्रेसवर निशाणा साधला. या हल्ल्याबाबत नुकतेच तत्कालीन केंद्रीयमंत्र्यांनी काँग्रेस सरकारला उघडं पाडलं, असे म्हणत पी. चिदंबरम यांनी २६/११ च्या हल्ल्यानंतर सरकारने घेतलेल्या भूमिकेची आठवण करुन दिली. तसेच, पहलगाम हल्ल्यानंतर मोदी सरकारने पाकिस्तानमध्ये घुसून जशास तसे प्रत्युत्तर दिल्याचेही मोदींनी म्हटले.

# नवी मुंबईजवळ तिसरी मुंबई, तर वाढवण बंदराजवळ चौथी मुंबईही उभारणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी मुंबई : नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन, मुंबई मेट्रो ३ च्या आचार्य अत्रे चौक ते कफ परेड या टप्प्याचं लोकार्पण आणि मेट्रो वन पच्या लोकार्पणाचा कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत पार पडला. या सोहळ्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभेला संबोधित केलं. यावेळी मुख्यमंत्र्यांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ तिसरी मुंबई आणि वाढवण बंदराजवळ चौथी मुंबई उभारणार असल्याचं जाहीर केलं.

**मुख्यमंत्र्यांची सर्वात मोठी घोषणा**

नवी मुंबई विमानतळ नवभारताचं प्रतीक

देवेंद्र फडणवीस म्हणाले, आजचा दिवस स्वप्नपूर्तीचा दिवस, गेले १० वर्ष मोदींच्या नेतृत्त्वात ज्या गोष्टी सांगतो आहोत, त्या प्रत्यक्ष लोकार्पित होत आहेत, ही आनंदाची गोष्ट आहे. आपलं विमानतळ नवभारताचं प्रतीक आहे. याची संकल्पना ९०च्या दशकातील होती. मुंबईहून पुण्याला जाताना बोर्ड लागलेला दिसायचा.काहीच पुढं व्हायचं नाही, असं फडणवीस यांनी सांगितलं.

मोदींच्या नेतृत्त्वात केंद्रात आणि महाराष्ट्रात सरकार आलं.आम्ही मोदीजींना विनंती केली. आपलं प्रगती आहे, त्यात नवी मुंबईचं विमानतळ घ्यावं, अशी विनंती केली. मोदींनी लगेचच नवी मुंबई विमानतळ प्रगतीमध्ये घेतलं. प्रगतीच्या अतंर्गत हे विमानतळ घेतल्यानंतर, ८ एनओसी हव्या होत्या, ज्या मिळत नव्हत्या. प्रगतीच्या बैठकीपूर्वी ७ एनओसी आल्या होत्या. त्यानंतर पुढच्या १५ दिवसात आठवी एनओसी आली. हे मोदींमुळं झालं, असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

नवी मुंबई विमानतळ ९ कोटी प्रवासी हाताळू शकेल, हे विमानतळ इंजिनिअरिंग मार्बल आहे. नदी परिवर्तित करावी लागली, डोंगर क्लिअर करावं लागलं. महाराष्ट्र आणि देशाच्या विकासात हे विमानतळ महत्त्वाचं योगदान देईल.

महाराष्ट्राचा जीडीपी १ टक्क्यानं वाढेल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

हे देशातील पहिलं विमानतळ आहे, ज्या विमानतळाला वॉटर टॅक्सी मिळणार आहे. वॉटर टॅक्सीतून थेट गेट वे ऑफ इंडियाला जाता येणार आहे.

दुसरी महत्त्वाची गोष्ट ४० किमीची अंडरग्राऊंड मेट्रो मोदींच्या आशीर्वादानं पार करत गेली. देशातील सर्वात मोठी अंडरग्राऊंड मेट्रो आहे. ही मेट्रो करत असताना अनेक अडथळे आले. ते पार करुन मेट्रोचं काम पूर्ण झालं, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

मोदीजींनी ट्रान्सपोर्टेशन यंत्रणेचं इंटिग्रेशन झालं पाहिजे, असं सांगितलं होतं. मेट्रो वन पच्या मोदींच्या हस्ते लाँच करतोय. त्या मेट्रो वन पवर मेट्रो, बस, वॉटर टॅक्सी, लोकल रेल्वे उपलब्ध होईल. याद्वारे मुंबईला सुगम करण्याचं काम होईल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

मोदीजींनी कौशल्य विकासाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. महाराष्ट्राच्या कौशल्य विकास मंत्रालयानं डढएझ चा कार्यक्रम हाती घेतला. नव्या संधी तरुणाईला मिळाव्यात म्हणून शॉर्ट टर्म कोर्सेस हाती घेण्यात आले आहेत, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# सरन्यायाधीशांवरील हल्ल्याचा प्रयत्न हा राष्ट्रद्रोह ठरवा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्याधीश भूषण गवई यांच्यावरील झालेल्या हल्ल्याचा प्रयत्न हा निंदनीय आहे.या हल्ल्याचा आम्ही तीव्र निषेध करतो.

सरन्यायाधीशांवरील हल्ला हा संविधानावरील लोकशाहीवरील न्याय प्रिय प्रत्येक नागरिकावर हा हल्ला आहे.हल्लेखोराने केलेला हल्ल्याचा प्रयत्न हा राष्ट्रद्रोह ठरवून त्या आरोपीवर कठोर कारवाई करावी अशी मागणी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केली आहे. न्यायपालिका हा लोकशाहीचा प्राण आहे.संविधानाचा प्राण आहे. सरन्यायाधीशांवरील हल्ला हा



न्यायपालिकेवरील हल्ला हा लोकशाहीच्या प्राणावर केलेला हल्ला असून हा हल्ल्याचा प्रकार राष्ट्रद्रोह ठरविला पाहिजे असे आपले मत असल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले. चातुर्वर्णातून आलेला वर्णभेद जातीभेद महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानातून संपविला आहे. तरीही काही लोकांच्या मनातून जातीभेद; वर्णभेद; भेदभाव गेलेला नाही. त्याच जातीवादी भावनेतून सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ला करण्याचा निंदनीय प्रयत्न झाला आहे. सरन्यायाधीशांवरील हल्ला हा संविधान लोकशाही आणि समता या संविधानिक मूल्यांवरील; न्यायव्यवस्थेवरील हल्ला आहे.हा राष्ट्रद्रोह ठरवा असा गुन्हा आहे .गुन्हेगारांवर कठोर कारवाई करावी अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली आहे.

**सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावरील हल्ल्याच्या प्रयत्नाचा तीव्र निषेध : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले**

# लाडक्या बहिणींची दिवाळी गोड! सप्टेंबरचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा, तब्बल ४१० कोटी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेतील लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा हप्ता देण्यासाठी ४१०.३० कोटी रुपयांच्या निधीला वित्त विभागाने बुधवारी मंजुरी दिली. त्यामुळे राज्यभरातील पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा हप्ता मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

अनूसुचित जाती घटकांकरिता पात्र लाभार्थ्यांसाठी हा निधी असणार असल्याचे यावेळी जाहीर करण्यात आले. हा निधी मंजूर करताना सामाजिक न्याय विभागांतर्गत देण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनाचा लाभ मिळणार नाही, याची दक्षता घेण्याची सूचना करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय बुधवारी जाहीर केला आहे. या शासन निर्णयानुसार मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेसाठी विभागाअंतर्गत ३,९६० कोटी इतका नितव्यय




मंजूर करण्यात आला आहे. त्यानंतर वित्त विभागाने सप्टेंबर महिन्यातील पात्र लाभार्थी महिलांना हप्ता देण्यासाठी एक पत्र काही दिवसांपूर्वी पाठवत निधी वितरणाची कार्यप्रणाली ठरवून दिली आहे. त्यानुसार पात्र लाभार्थ्यांना सप्टेंबर महिन्याचा हप्ता देण्यासाठी निधीला अर्थ विभागाने बुधवारी मंजुरी दिली. या निधीला मंजुरी देताना सामाजिक न्याय विभागाने एक महत्वपूर्ण सूचना महिला व बालविकास विभागाला केली आहे. त्यानुसार अनुसूचित जातीच्या व नवबौद्ध प्रवर्गातील महिला लाभार्थी संख्या उपलब्ध करुन देण्याची सूचना केली. त्याचबरोबर उपलब्ध निधीचा वापर हा अनूसुचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी होईल, याची दक्षता घेण्याची सूचना केली. त्याशिवाय विभागाअंतर्गत संजय गांधी निराधर योजना , श्रावण बाळ सेवा राज्य निवृत्त वेतन योजनांतर्गतील पात्र लाभार्थ्यांना लाडकी बहिण योजनेचा हप्ता मिळणार नाही, याची सूचनाही केली.

**प्रधानमंत्री मोदीजींच्या हस्ते आयटीआयच्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचा शुभारंभ**

**राज्याच्या कौशल्य विकास विभागाचे प्रधानमंत्री मोदीजींनी केले कौतुक**

# अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमांमुळे तरुणांना प्रगतीची सुवर्णसंधी : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारताला प्रगतीच्या नव्या उंचीवर घेऊन जाणारे लोकप्रिय प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी यांनी महाराष्ट्राच्या कौशल्य विकास विभागाचे कौतुक केले असून, आजपासून आयटीआयमध्ये सुरु झालेल्या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांमुळे तरुणांना रोजगाराची सुवर्णसंधी असल्याचे प्रतिपादन प्रधानमंत्री मोदीजी यांनी केले आहे. देश वेगाने प्रगती साधत असून, युवकांसाठी हा संधीचा सुवर्णकाळ असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नवी मुंबई विमानतळाच्या लोकार्पण सोहळ्यात मोदीजी यांच्या हस्ते अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचाही ऑनलाईन शुभारंभ करण्यात आला. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील युवकांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदीजी यांच्या शुभहस्ते नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मुंबई मेट्रो तीनच्या अंतिम टप्प्याचा लोकार्पण सोहळा पार पडला. तसेच यावेळी त्यांच्या हस्ते राज्यातील ४१९ औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि १४१ शासकीय तांत्रिक विद्यालयात अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांचाही शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला राज्यपाल श्री. आचार्य देवव्रत, केंद्रीय हवाई वाहतूक मंत्री श्री. किंजरापू नायडू, मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार ,उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे, केंद्रीय राज्यमंत्री श्री मुरलीधर मोहोळ आणि कौशल्य, रोजगार,उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा व इतर मान्यवर



उपस्थित होते.

यावेळी मोदीजी म्हणाले की, या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमात काळाला अनुरूप अत्याधुनिक रोबोटिक, ग्रीन हायड्रोजन ॲडिटिव्ह मॅन्युफॅक्चरिंग, ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रिक वाहन, सोलर ऊर्जा, सायबर सुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्ज, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सोशल मीडिया प्रभावक (इन्फ्लुएंसर) इत्यादी अत्याधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे. हे अभ्यासक्रम प्रशिक्षणार्थींनानव्याप्रगतीच्या मार्गावर घेऊन जाणार आहेत. त्याचबरोबर त्यांनी नमूद केले की, देशातल्या आयटीआयला अत्याधुनिक तंत्रज्ञानासह जागतिक दर्जाच्या रोजगाराभिमुख संस्था बनवण्यासाठी केंद्र सरकारने ६० हजार कोटींची नुकतीच पीएम सेतू योजना सुरु केली आहे, त्याचाही देशातल्या युवकांना लाभ होणार आहे.

प्रगतीची दूरदृष्टी असलेले राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनीही यावेळी आयटीआयमधील अल्पमुदतीच्या रोजगारक्षम अभ्यासक्रमाचे महत्व विशद केले. प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी कौशल्य विकासाला नवी दिशा देण्याचे काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वात नव्या भारताची निर्मिती होत आहे.

या काळात अत्याधुनिक अभ्यासक्रमांच्या माध्यमाने आम्ही कौशल्ययुक्त महाराष्ट्र घडवू, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. दरम्यान, अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमांच्या नोंदणीचे ७५ हजार उद्दिष्ट असताना शुभारंभालाच राज्यातील सुमारे एक लाख तीन हजारपेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी नोंदणी करून, उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे.

पुढील वर्षात ही संख्या ५ लाखाच्यावर नेणार असल्याचे राज्याच्या कौशल्य विकास विभागाने सांगितले आहे.

एकीकडे प्रधानमंत्री मोदीजी यांच्या शुभहस्ते नवी मुंबईत 'अल्पमुदतीचे रोजगारक्षम अभ्यासक्रम' या महत्वकांक्षी उपक्रमाचे उदघाटन होत असतानाच राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि शासकीय तांत्रिक विद्यालये मिळून ५६० संस्थांमध्ये एकाच वेळी विश्वकर्मांच्या प्रमुख उपस्थितीत या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात आल्याचे राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले. सुदृढ आणि सौहार्दपूर्ण समाज निर्माण करण्यासाठी कामगारांना सन्मानाचे स्थान मिळायला हवे हा प्रधानमंत्री मोदीजींचा विचार आम्ही या निमित्ताने पुढे घेऊन जात असल्याचेही मंत्री लोढा यांनी यावेळी नमूद केले.

## संपादकीय....

# विकासाची झेप


बहुचर्चित आणि बहुप्रतिक्षित नवी मुंबई विमानतळाचे लोकार्पण आज पंतप्रधान नरेंद्र मोदींच्याहस्ते करण्यात आले. त्यामुळे, आता लवकरच नवी मुंबईतून विमानाचे उड्डाण होणार असून डिसेंबर महिन्यात पहिले विमान आकाशी झेप घेणार आहे. सन १९९० च्या दशकातील ह्या विमानतळाची सं कल्पना असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात सांगितले. तर, मोदींनी आपल्या भाषणाची सुरुवात करताना, विजया दशमी, कोजागिरी आणि दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. मित्रो, आज मुंबईचा गेल्या अनेक वर्षांपासूनची प्रतिक्षा संपुष्टात आली. आता मुंबईला दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ मिळालं आहे. आशियातील सर्वात मोठे कनेक्टिव्हीटी हब म्हणून याची भविष्यात ओळख होईल, असेही मोदींनी म्हटले. तसेच, मुंबईत अंडरग्राऊंड मेट्रोचेही लोकार्पण झाले असून विकसित भारताचं हे प्रतिक असल्याचं मोदींनी म्हटलं. तसेच, काँग्रेस आणि महाविकास आघाडीच्या तत्कालीन सरकारवरही टीका केली. मित्रांनो ही वेळ भारतीय युवकांसाठी असंख्या संधींचा क्षण आहे. मी महाराष्ट्रातील तरुणांना शुभेच्छा देतो, महाराष्ट्रातील लोकनेते दि.बा. पाटील यांचीही आठवण मी आज काढतो. त्यांचे सामाजिक जीवन, शेतकऱ्यांप्रती तळमळ आपल्यासाठी प्रेरणा आहे, असेही मोदींनी म्हटले. गेल्या ११ वर्षात भारतात वेगाने विकास होत आहे, वंदे भारत रुळावरुन धावते, हायवे आणि एक्सप्रेस नव्या शहरांना जोडत आहेत, बुलेट ट्रेनचं स्वप्न वेगाने साकार होत आहे, डोंगर-दऱ्यांमधून नवे बोगदे बनत आहेत. नवी मुंबई एअरपोर्ट हे विकसित भारताचे प्रतिक आहे, याचा आकार कमळाच्या फुलासारखा असून छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीवर बनलेला आहे, असे मोदींनी म्हटले. नवी मुंबई विमानतळामुळे येते गुंतवणूक वाढेल, नवे उद्योग निर्माण होतील, रोजगार निर्माण होतील. स्वप्नांना पूर्ण करण्याची इच्छाशक्ती असल्यास रिझल्टही दिसून येतात. २०१४ मध्ये मला देशवायीसांनी संधी दिली, तेव्हा माझं स्वप्न होतं, हवाई चप्पल घालणाऱ्यानेही हवाई सफर केला पाहिजे, आज ते प्रत्यक्षात होत आहे. आज भारतात विमानतळांची संख्या १६० च्या पुढे गेली आहे. जेव्हा लहान-सहान शहरात विमानतळ बनत आहेत, तेव्हा विकासाला गती मिळते. उडान योजनेंतर्गत लाखो लोकांनी हवाई प्रवास करत आपलं स्वप्न पूर्ण केलं. सध्या, भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाचा डोमेस्टिक एविएशन मार्केट आहे.

# भावनिक नात्याचं प्रतिक : करवा चौथ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

'करवा' म्हणजे मातीचा कलश किंवा भांडे आणि 'चौथ' म्हणजे चतुर्थी. कार्तिक महिन्यातील कृष्णपक्षाची चतुर्थी या दिवशी 'करवा चौथ' साजरा केला जातो. या दिवशी विवाहित स्त्रिया सूर्योदयापासून ते चंद्रदर्शनापर्यंत उपवास धरून पतीच्या दीर्घायुष्याची व सुखी वैवाहिक जीवनाची प्रार्थना करतात. भारत हा सण-उत्सवांचा देश आहे. प्रत्येक प्रांतातील वेगवेगळ्या प्रथा-परंपरा येथे जपल्या जातात. त्यातही स्त्रीच्या सौभाग्यासाठी व पतीच्या दीर्घायुष्यासाठी साजरा होणारा 'करवा चौथ हा व्रतप्रधान सण विशेष महत्त्वाचा मानला जातो. उत्तर भारतातील पंजाब, हरियाणा, दिल्ली, राजस्थान, उत्तर प्रदेश या भागात हा सण मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. आता त्याचा प्रभाव महाराष्ट्रासह इतर राज्यांतही दिसून येतो. करवा चौथ ही केवळ धार्मिक परंपरा नसून पती-पत्नीतील भावनिक नात्याचे प्रतीक आहे. या सणामुळे स्त्रियांच्या आयुष्यात श्रद्धा, संयम व कुटुंबाबद्दलची निष्ठा दृढ होते. स्त्रियांची सजावट, मेहंदी, नृत्य, गाणी या माध्यमातून आनंद व उत्साह निर्माण होतो. आजच्या काळात नवरा-बायको दोघेही एकमेकांसाठी उपवास करतात ही एक नवी सकारात्मक परंपरा उदयाला येत असुन या सणाला सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक काळातील बदल म्हणजे पूर्वी करवा चौथ हा सण फक्त पारंपरिक पद्धतीने ग्रामीण व शहरी घरांमध्ये साजरा होत असे. आता मात्र चित्रपट, मालिका, सोशल मीडियाच्या प्रभावामुळे या सणाची लोकप्रियता संपूर्ण देशभर वाढली आहे. शहरी भागात महिलांसाठी खास करवा चौथ समारंभ, फॅशन शो, मेहंदी स्पर्धा यांचे आयोजन केले जाते. करवा चौथ हा सण स्त्रीच्या श्रद्धा, प्रेम आणि समर्पणाचा प्रतीक आहे. पतीच्या दीर्घायुष्यासाठी स्त्रिया करीत असलेले हे व्रत केवळ धार्मिक नसून कौटुंबिक ऐक्य व वैवाहिक जीवनातील बंध दृढ करणारा आहे. बदलत्या काळानुसार या सणाच्या पद्धतीत फेरबदल झाले असले तरी त्यामागचा मुख्य उद्देश आजही तितकाच जिवंत आहे, पती-पत्नीतील प्रेम आणि कुटुंबाचे सुख-समाधान.

करवा चौथशी निगडित अनेक कथा प्रचलित आहेत. त्यापैकी एक कथा सती सावित्रीची आहे. सावित्रीने आपल्या तपश्चर्येने मृत्यूदेव यमराजालाही पती सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागले होते. त्यामुळे या व्रताचा संबंध पतीच्या आयुष्याशी जोडला गेला आहे. दुसरी कथा पांडवांच्या काळाशी निगडित आहे. म्हणे, द्रौपदीनेही पती अर्जुनाच्या कल्याणासाठी करवा चौथचे व्रत केले होते. त्यामुळे पतीच्या सुरक्षिततेसाठी व सौख्यासाठी हे व्रत स्त्रिया आचरणात आणतात. करवा चौथ व्रताची पद्धत म्हणजे सकाळची सुरुवात विवाहित स्त्री सूर्योदयापूर्वी 'सर्गी'नावाचे भोजन करते. हे भोजन प्रामुख्याने सासरच्या मंडळींकडून दिले जाते. तसेच, दिवसभर अन्न व पाणी न घेता उपवास केला जातो. दिवसभर स्त्रिया सजतात, मेहंदी लावतात, नटतात. संध्याकाळचा पूजाविधीच्या वेळी करव्यामध्ये पाणी, धान्य भरले जाते. सखी-सोबती स्त्रिया एकत्र बसून पूजा करतात व आख्यायिका ऐकतात आणि शेवटी चंद्रदर्शन रात्री चंद्र उगवल्यावर त्याला चलणी अथवा जाळीदार वस्त्रातून पाहिले जाते. त्यानंतर पतीला त्याच चलणीतून पाहून पतीच्या हातून पाणी व अन्न घेऊन उपवास सोडला जातो.



करवा चौथ म्हटले की डोळ्यासमोर येते ते सुहागिन बायका, चंद्राला चलनीतून पाहणारी दृश्ये आणि पतीच्या दीर्घायुष्याची प्रार्थना. पण आजच्या आधुनिक काळात हा सण फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित राहिलेला नाही. आता तरुण प्रेमिके-प्रेमिकाही करवा चौथ साजरा करून आपल्या नात्यातील बंध अधिक घट्ट करतात. प्रेमिकांसाठी करवा चौथ म्हणजे प्रेमाचे व्रत. दिवसभर न खाता-पिता एकमेकांसाठी उपवास करणे ही केवळ परंपरा नाही, तर एकमेकांसाठी असलेली काळजी आणि निष्ठा व्यक्त करण्याचा सुंदर मार्ग आहे. मुलगी आपल्या प्रियकराच्या यशासाठी, तर मुलगा आपल्या प्रेयसीच्या सुखासाठी प्रार्थना करतो. आज सोशल मीडियाच्या युगात जोडपी हा दिवस खास बनवतात. गिफ्ट्स देऊन, चंद्र पाहून एकत्र व्रत सोडून आणि आयुष्यभर एकमेकांसोबत राहण्याच्या वचनांनी. करवा चौथ प्रेमिकांसाठी केवळ धार्मिक विधी नसून, तो प्रेम, विश्वास आणि एकत्रित आयुष्याची आशा जपणारा सण बनला आहे. काही पारंपरिक विचारांचे लोक याकडे वेगळ्या नजरेने पाहतात, कारण करवा चौथ मूळतः वैवाहिक बंधनासाठी होता. मात्र बदलत्या काळात हा सण नात्यांमध्ये विश्वास, समर्पण आणि प्रेम वाढवणारा म्हणून तरुण पिढीत वेगळ्या अंगाने स्वीकारला जातो. आजच्या पिढीसाठी करवा चौथ हा फक्त पती-पत्नीपुरता मर्यादित न राहता प्रेमिक-प्रेमिकांच्या नात्यातील भावनिक जवळीक वाढवणारा सण ठरत आहे. प्रेमात असलेली जोडपी हा दिवस आपापल्या पद्धतीने साजरा करून नात्यातील प्रेम, आदर आणि बांधिलकी अधिक दृढ करतात.



– प्रवीण बागडे, नागपूर
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

एकेकाळी एका नवविवाहित महिलेने आपल्या माहेरी असतांना हे व्रत केले. ती सुस्वरूप अशी युवती होती. तिने कठोरपणे आपला उपवास पालन केला. तिच्या तपाने तिला दीर्घायुष्य मिळाले. भावांनी जवळच्या डोंगरावर अग्नी प्रज्वलित केला आणि तिला सांगितले की चंद्र उगवला आहे. व्रताची समाप्ती करताना चंद्राचे दर्शन घेण्यासाठी ती तिथे गेली पण तिला लक्षात आले की भावांनी आपल्याला फसविले आहे. तिचे व्रत मोडल्याने तिच्या पतीच्या निधनाची बातमी तिला समजली. ती बातमी कळताच ती आपल्या पतीच्या घरी निघाली. वाटेत तिला शिव पार्वती भेटले आणि त्यांनी तिला असे का घडले असावे हे कथन केले. पार्वतीने तिला आपल्या करंगळीच्या टोकातून थोडे रक्त दिले आणि आपल्या पतीच्या मुखावर शिंपडण्यास सांगितले. भविष्यकाळात तिने अगदी कठोरपणे हे व्रत पाळण्याचा सल्लाही देवीने तिला दिला. सासरी पोहोचल्यावर तिने पार्वतीने दिलेले रक्त पतीच्या मुखावर शिंपडले आणि तो पुनरूज्जीवित झाला. त्यानंतर या महिलेने निष्ठेने करवा चौथ व्रत पालन केले आणि तिला सुख समृद्धी प्राप्त झाली अशी या व्रतामागील आख्यायिका आहे.

करवा चौथ हे हिंदू व्रत आहे. हे व्रत दिल्ली, हरियाणा, राजस्थान, पंजाब, उत्तर प्रदेश, जम्मू, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश या प्रांतात केले जाते. आश्विन कृष्ण चतुर्थीच्या दिवशी विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीर्घायुरोग्यासाठी आणि समृद्धीसाठी पूर्ण दिवस उपवास करतात. संध्याकाळी चंद्र उगवल्यावर चाळणीतून प्रथम चंद्राचे दर्शन व नंतर पतीचा चेहरा पाहतात. क्वचित अविवाहित स्त्रियाही आपल्या इच्छित पतीसाठी हे व्रत करतात. सनातन धर्माच्या लोकांसाठी करवा चौथ व्रताचे विशेष महत्त्व आहे. विवाहित स्त्रिया आपल्या पतीच्या दीधार्युष्यासाठी, उत्तम आरोग्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी हे व्रत करतात. तथापि हा उपवास खूप कठीण आहे, कारण या उपवासात अन्नाबरोबरच पाणी पिण्यासही मनाई आहे, म्हणजेच हा निर्जल उपवास ठेवण्याचा नियम आहे. संध्याकाळी चंद्र देवाला जल अर्पण केल्यावरच हे वत मोडले जाते. करवा चौथ व्रताचे अनेक महत्त्वाचे नियम आहेत, त्यांचे पालन न केल्यास स्त्रियांना त्यांच्या पूजेचे पूर्ण फळ मिळत नाही.

यादिवशी गणपती आणि करवा देवी व्यतिरिक्त चंद्र देवाची पूजा करणे देखील महत्त्वाचे आहे. चंद्र देव हे वय, सुख, समृद्धी आणि शांतीसाठी जबाबदार ग्रह मानला जातो. करवा चौथच्या दिवशी चंद्र देवाची पूजा केल्याने वैवाहिक जीवन सुखी राहते. याशिवाय पतीचे वय वाढण्याची शक्यता ही वाढते. देशातील अनेक राज्यांमध्ये करवा चौथ चा उपवास करक चतुर्थी व्रत म्हणूनही ओळखला जातो, करवा चौथ व्रताचे महत्वाचे नियम करवा चौथ उपवास सूर्योदयापूर्वी सुरू होतो आणि चंद्र उगवल्यानंतर समाप्त होतो. चंद्र देवाचे दर्शन घेऊनच हे व्रत मोडावे. वास्तुशास्त्रानुसार संध्याकाळी शिव परिवाराची पूजा करताना स्त्रीचे तोंड पूर्वेकडे असावे. या दिशेला तोंड करून पूजा करणे शुभ असते.

पारंपरिकदृष्ट्या करवा चौथ हा सण विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्याच्या कामनेसाठी साजरा करतात. परंतु आधुनिक काळात, विशेषतः तरुणाईमध्ये, हा सण प्रेमिक-प्रेमिकांमध्ये देखील लोकप्रिय होत आहे. पूर्वी करवा चौथ हा फक्त सौभाग्यवती स्त्रियांचा सण मानला जात असे. पण आता प्रेमात असलेल्या जोडपीदेखील एकमेकांप्रती निष्ठा, प्रेम आणि बांधिलकी दाखवण्यासाठी हा दिवस साजरा करतात. या दिवशी अनेक तरुणी आपल्या बॉयफ्रेंडसाठी दिवसभर उपवास धरतात आणि त्याच्यासाठी सुख-समृद्धी व यशाची प्रार्थना करतात. तसेच, काही वेळा तरुण मुलंही आपल्या प्रेयसीसाठी उपवास करतात, जेणेकरून नात्यात समानतेचा आणि परस्पर प्रेमाचा संदेश जाईल.

आजकाल सोशल मीडियाच्या प्रभावामुळे करवा चौथ इन्स्टाग्राम, फेसबुक, व्हॉट्सपवर प्रेमिके-प्रेमिके करवा चौथच्या शुभेच्छा देतात, फोटो शेअर करतात. एकत्र उपवास – काही प्रेमिके उपवास एकत्र धरतात आणि चंद्र पाहिल्यावर नाते अधिक दृढ करण्याची प्रतिज्ञा करतात. बॉयफ्रेंड/गर्लफ्रेंड या दिवशी एकमेकांना खास भेटवस्तू व सरप्राईजेस देतात, ज्यामुळे हा दिवस संस्मरणीय ठरतो. पारंपरिक विधींची शाब्दिक नक्कल केली जाते, पण त्यामागे खरी भावना असते ती म्हणजे रोमँटिक अँगल एकमेकांवरील प्रेम आणि काळजी. सर्वांना करवा चौथच्या हार्दिक शुभेच्छा.

# एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : कृषि समृद्धी योजनेंतर्गत सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्यास एकूण रु. ५१९४.०० लाख निधीची मंजुरी प्राप्त झाली आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी रु. ४१३५.४२ लाख, अनुसूचित जातीसाठी रु. ९९१.१८ लाख व अनुसूचित जमातीसाठी रु. ६७.४० लाख इतका निधी उपलब्ध आहे.

या अभियानांतर्गत शेतकऱ्यांना खालील घटकांचा लाभ घेता येणार आहे–

– ड्रॅगन फ्रुट, ॲव्होकॅडो, सुटटी फुले, मसाला पिके – फळांना कव्हर, तण नियंत्रक आच्छादन

– सामुहिक शेततळे, शेततळे अस्तरीकरण

– ट्रॅक्टर, पावर टिलर, इतर औजारे

– पॅक हाऊस, कांदाचाळ, प्राथमिक प्रक्रिया केंद्र

– रेफर व्हॅन, शीतगृह, शीतसाखळी, शीतखोली

– रायपनिंग चेंबर, लागवड साहित्य, फळबाग पुनर्जीवन

– मधुमक्षिक पालन, आळिंबी उत्पादन केंद्र

– हरितगृह, शेडनेट हाऊस, प्लास्टिक मल्चिंग इत्यादी

लाभार्थी निवडीचे निकष :

– शेतकऱ्यांच्या नावावर स्वतःची शेतजमीन असणे आवश्यक

– फलोत्पादन क्षेत्रातील पिके (फळे, भाजीपाला, फुले इ.) असणे आवश्यक

सोलापूर जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील पात्र शेतकऱ्यांनी वरील घटकांचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टल वर अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी श्री. शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित कृषि कार्यालयाशी संपर्क साधावा.

# नळदुर्ग नगर परिषदचे आरक्षण सोडत जाहीर, महिलांना पन्नास टक्के संधी

## सोडत जाहीर होताच काही नागरिकांच्या चेहऱ्यावरील हसू गायब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग येथे होऊ घातलेल्या नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी नगर परिषदेच्या सभागृहात आरक्षण सोडत जाहीर करण्यात आले यामध्ये प्रभाग निहाय सोडत जाहीर करण्यात आले तर महिलाना पन्नास टक्के आरक्षण देण्यात आले आसुन एकुण २० सदस्या पैकी १० सदस्या ह्या महिला राहाणार आहेत

आज दिनांक ८ अक्टोबर २०२५ सकाळी नगर परिषद येथे पिठासन अधिकारी अरुणा गायकवाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी लहान मुलांना घेऊन चिठ्ठी काढून हे आरक्षण जाहीर करण्यात आले.

अगोदर अनुसुचित जातीचे आरक्षण जाहीर करण्यात आले नंतर इतर मागास प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आले उर्वरीत आरक्षण मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार यांनी वाचुन दाखवून नियमा प्रमाणे आरक्षण जाहीर करण्यात आले.

प्रभाग १ अ नाममात्र मागास प्रवर्ग महिला ब सर्वसाधारण

प्रभाग २ अ अनुसचित जाती पुरुष ब सर्वसाधरण महिला

प्रभाग ३ अ नाममात्र मागास प्रवर्ग ब सर्वसाधारण महिला

प्रभाग ४ अ सर्वसाधारण महिला

ब सर्वसाधारण प्रभाग ५ अ सर्व साधारण महिला ब सर्व साधारण प्रभाग ६ अ नाममात्र मागास प्रवर्ग महिला ब सर्वसाधारण प्रभाग ७ अ नाममात्र मागास प्रवर्ग ब सर्व साधारण महिला प्रभाग ८ अ अनुसुचित जाती महिला ब सर्व साधारण प्रभाग ९ अ नाममात्र मागास प्रवर्ग महिला ब सर्व साधारण महिला प्रभाग १० अ अनुसुचित जाती महिला ब सर्व साधारा आशा प्रकारे आरक्षण जाहीर करण्यात आले आसून आरक्षण जाहीर होताच अनेकांच्या चेहऱ्यावरील हासू गायब झाल्याचे दिसून आले.




अनेकजन नगर परिषदेचा सदस्य बनण्यासाठी गुडग्याल बाशिंग बांधून तयार आहेत परंतु काही ठिकाणी आरक्षण सोडत मना सारखी झाली नसल्याने मने नाराज झाली आहेत पण नगराध्यक्ष पदावरून सर्वसाधारण मधून कोण होणार नगराध्यक्ष याकडे मात्र सर्वाचे लक्ष लागले आहे.

# न्यायमूर्ती गवई यांच्यावरील हल्लेखोरावर देशद्रोहचा गुन्हा दाखल करण्यात यावा : भीमशक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : देशाचे मुख्य न्यायाधीश श्री भूषण गवई यांच्यावर एका सनातन वादी वकील राकेश किशोर याने चप्पल फेकून मारण्याचा जो भ्याड प्रयन्त केला त्याचा भीम शक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला असून त्या सनातन वादी वकिलावर देश द्रोहचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून निवासी उपजिल्हधिकारी श्री पाटील यांच्याकडे केली आहे वास्तविक पाहता मुख्य नायधिस यांच्यावर हल्ला म्हणजे देश्यावर



हल्ला संविधानावर हल्ला या हल्लयामुळे देशाची इज्जत संपूर्ण जागा मध्ये गेली आहे आणि तरी सुद्धा हा नीच वकील म्हणतो की माज्यावर कोणताही परिणाम. होत नाही हे मला देवानेच करण्यास भाग पडले आहे गेल्या साप्ताहत देशाचे विरोधी पक्षणेते राहुल गांधी यांना गोळी घालून ठार मारण्याची धमकी देण्यात आली तरी सुद्धा जर देश आणि देश्यातील जनता शांत बसत असतील तर हे लोक देश्यावर एका धर्म संस्कृतीचे राज्य निर्माण करण्यासाठी कोणतेही पाऊल उचलतील तर आपण किती शांत बसावे आणि का असा प्रश्न जनतेला पडला असून जशास तसें उत्तर देण्यासाठी भीम शक्ती संघटना तयार आहे. आणि म्हणून या सनातनी. वकिला. वर देश द्रोहचा गुणांफाखल करून झेल मध्ये. टाकण्याच. काम केंद्र. सरकार. देशाचे पंतप्रधान मोदी गृह मंत्री अमित शहा यांचे आहे देशाची. इज्जत वाचवायची असेल तर देश द्रोहचा गुन्हा दाखल करावा. अन्यथा भीम शक्ती. संघटनेला. वेगळा मार्गाचा अवलंब करावा लागेल. असा इशारा. निवेदनाच्या माध्यमातून देण्यात आला. आहे यावेळी. भीम शक्ती. चे सुबोध वाघमोडे. राजाभाऊ कदम मेजर सुखदेव साबळे उमेश सुरते. सौ प्रमिला तुपलोंढे ज्योती ताई गायकवाड अश्विनी सोलापुरे सलीमभाई मुल्ला के एम कांबळे बिक्रम वाघमारे इब्राफिम शेख कीर्ती शिवशरण. राजाभाऊ खंदारे समीर मुजावर हर्षदीप बसनसोडे रविराजे. चंद्रकर रामाताई लालसरे अशोक नागटिळक सुरेश जाधव मर्या रावडे शशिकांत विरपुरे. आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

# भारताचे सर न्यायाधीशांवरील हल्ल्याचे अक्कलकोट रिपाइं(आठवले) कडून निषेध




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : भारतीय सर न्यायाधीश भूषण कुमार गवई यांच्यावरील हल्ले यांचं अक्कलकोट रिपाइं(आठवले)कडून तिव्र निषेध करण्यात आली आहे.

रिपाइं ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे अविनाश मडिखांबे यांच्या नेतृत्वाखाली तहसिलदार विनायक मगर साहेब यांच्याकडे निषेदार्थ निवेदन देण्यात आली आहे. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे व शहर अध्यक्ष अजय मुकणार यांचे समयोचित निषेधपर भाषणे झाली.

यावेळी रिपाइं जिल्हा उपाध्यक्ष सैदप्पा झळकी, ता अध्यक्ष अविनाश मडिखांबे, युवक ता अध्यक्ष अप्पा भालेराव, शहर अध्यक्ष अजय मुकणार, ता सचिव राजु भगळे, अंबादास गायकवाड, महेदिमिया जिडगे, सुरेश सोनकांबळे, प्रकाश गडगडे, राजु बोरगाव, लक्ष्मीकांत दसाडे, अंबादास शिंगे, सधूधरेश गायकवाड व इतर पदाधिकारी उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मराठी भाषेला समृद्ध ज्ञान वारसा लाभल्यामुळेच ती अभिजात ठरली आहे : डॉ.कृष्णा इंगोले



## केबीपी महाविद्यालयात अभिजात भाषा सप्ताहनिमित्त व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर- मराठी ही समृध्द ऐतिहासिक वारसा असणारी ज्ञान भाषा आहे. भाषा हे संपूर्ण मानवी व्यवहाराचे साधन असते. तसेच विचार, भावना आणि संवेदना व्यक्त करण्याचे महत्त्वाचे माध्यम भाषाच असते. मातृभाषा ही आपल्या काळजाची भाषा असते. अभिजात भाषा म्हणजेच दर्जेदार भाषा होय. मराठी ही श्रेष्ठ भाषा असून महाराष्ट्रामध्ये ती अडीच हजार वर्षापासून सलगपणे चालत आली आहे. चक्रधर स्वामी, ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ, जनाबाई आदी संत मंडळीनी मराठी भाषेला अधिक उन्नत बनविले. मराठी ही महाराष्ट्री प्रकृतापासून आली असून आज जगभरामध्ये बारा ते चौदा कोटी लोक मराठी भाषा बोलतात. याच बरोबर जगभरातील भाषेमध्ये मराठी ही दहाव्या क्रमांकाची महत्त्वाची भाषा आहे. असे विचार ज्येष्ठ अभ्यासक प्रा. कृष्णा इंगोले यांनी व्यक्त केले. ते येथील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मराठी विभाग व महाराष्ट्र राज्य विश्वकोश विश्वकोश निर्मिती मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आयोजित व्याख्यानात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी व्यासपीठावर डॉ.दत्ता घोलप, लेखक श्री.शहाजी बलवंत, म.सा.प. पंढरपुर शाखेचे श्री.कल्याणराव शिंदे, श्री.अशोक माळी, उपप्राचार्य डॉ.भगवान नाईकनवरे, डॉ.सुशील शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी महाराष्ट्र विश्वकोश मंडळाचे सहायक संपादक डॉ. दत्ता घोलप यांनी प्रास्ताविकामध्ये विश्वकोश मंडळाचे कार्य व विश्वकोशाच्या लेखनाची समृद्धता व्यक्त केली व कोशलेखनाच्या नव्या दृष्टिकोनाविषयी सविस्तर मांडणी केली. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.बाळासाहेब बलवंत म्हणाले की, आपली मातृभाषा मराठी असल्याचा आपल्या सर्वांना अभिमान आहे. मराठी भाषा समृध्द करण्यासाठी अनेकांनी आपले योगदान दिले आहे. आपली मातृभाषा अधिकाधिक समृध्द करण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्नशील असणे महत्त्वाचे आहे. पाहुण्यांचा परिचय व स्वागत मराठी विभाग प्रमुख प्रो. डॉ.रमेश शिंदे यांनी करून दिला. यावेळी आभार प्रा.हरिभजन कांबळे यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.सारिका भांगे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठी विभागातील प्रा. डॉ.दत्ता डांगे, प्रा.बापूसाहेब घोडके, प्रा. अंकुश घुले, प्रा. मोहिनी सावंत यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, साहित्यप्रेमी तसेच शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पंढरपूर नगरपरिषदेने आठ मयत कर्मचाऱ्यांचे वारसांना दिल्या अनुकंपा खालील नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिकेमध्ये आठ कर्मचारी सेवेत असताना माहीत झाले होते. या मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा खाली नियुक्ती मिळावी म्हणून सन २०१६ पासून महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी समन्वय समिती व संघर्ष समितीच्या माध्यमातून शासनाच्या विरोधात वेळोवेळी आंदोलन करण्यात आली होती याबाबत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याशी महाराष्ट्र राज्य नगरपरिषद कर्मचारी संघर्ष समितीच्या वतीने चर्चा झाली होती यावर शासनाने राज्यातील गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या असलेल्या महाराष्ट्रातील शासकीय कार्यालय , नगरपालिका महानगरपालिकेमधील सेवेत असताना




मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा खाली नियुक्ती द्यावी म्हणून आदेश दिले होते. अनुसार पंढरपूर नगरपरिषदेमधील सेवेत असताना मयत झालेल्या आठ कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा खाली नियुक्ती मिळावी म्हणून माजी आमदार प्रशांतराव परिचारक व मुख्याधिकारी महेश रोकडे यांना पंढरपूर नगरपरिषद कामगार संघटना इंटेक्स च्या वतीने निवेदन देण्यात आले होते. यावर माजी आमदार प्रशांतराव परिचारक यांनी मुख्याधिकारी यांना शासनाच्या निर्णयानुसार अनुकंपाच्या नियुक्ती देण्याबाबत सांगितले होते.

दरम्यान पंढरपूर नगरपरिषदेचे प्रशासक सचिन इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी त्वरित अनुकंपा धारकांना नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला व अनुकंपाधारक वैशाली बारस्कर, विश्वनाथ मिसाळ, विनायक जाधव, ऋषिकेश देशपांडे, राहुल लोखंडे, अजय ढवळे, समर्थ शेंडगे, वैभव शिंदे, या आठ अनुकंपधारकांनादरम्यान पंढरपूर नगर परिषदेचे प्रशासक सचिन इथपे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी त्वरित अनुकंपाधारकांना नियुक्ती देण्याचा निर्णय घेतला व या अनुकंपधारकांना वैशाली बारस्कर, विश्वनाथ मिसाळ ,विनायक जाधव, ऋषिकेश देशपांडे ,राहुल लोखंडे, अजय ढवळे ,समर्थ शेंडगे, वैभव शिंदे, या आठ अनुकंपधारकांना मुख्याधिकारी महेश रोकडे यांच्या शुभहस्ते नियुक्ती आदेश देण्यात आले.

---

# गर्दुल्ल्यांविरोधात मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांच्या पुढाकाराने घाटकोपरवासी एकवटले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांनी अंमलीपदार्थ आणि नशाबंदी घाटकोपर नशाबंदी विरोधात मोहीम सुरु केली.मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई हे प्रत्येक वेळेला काहीना काही विषय घेत समाजाला न्याय मिळविण्यासाठी लढा देण्यासाठी सर्व पक्षाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना एकत्रित करुन प्रयत्न करीत असते.यावेळी मोकळा श्वास फाउंडेशन मुबंई यांच्या सर्व पदाधिकारी यांनी घाटकोपर पश्चिम पोलीस ठाण्यातले वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतिश जाधव यांची या संदर्भात भेट घेतली. तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक सतिश पाटील यांनी ही हा गंभीर विषय समजून घेत यासाठी वेळ देत विषय समजावून घेतला.व बहुमूल्य सल्ला देऊन एक विशेष नशाबंदी कारवाई मधील ढउ अधिकारी श्रृगारे व त्यांची टीम तुम्हाला २४ तास सहकार्य करेल



असे त्यांनी यावेळी असे आश्वासन दिले.यावेळी घाटकोपर पश्चिम येथील अनेक समाज-सेवक लोकप्रतिनिधी सोबत होते.

यावेळी श्रीमती नंदाताई गव्हाणे, सौ.अश्विनी मते, माजी नगरसेवक दिपकबाबा हांडे तसेच सुर्यकांत गवळी, उमाकांत चव्हाण, प्रकाश पाटील, दत्तात्रय चौगुले, प्रकाश तावडे,विजय बाबर, संतोष सांळुखे,राष्ट्रवादी काँग्रेसचे अमोल मातेले तसेच संस्थेचे प्रतिनिधी संतोष कोकांटी, प्रतिक थोरात, संदीप सावंत,राजू सावंत उपस्थित होते.

---

# पदवीधर व शिक्षक मतदार नोंदणीचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : भारत निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पुणे विभागाच्या पदवीधर व शिक्षक मतदारसंघ निवडणूक २०२६ करीता मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर झाला आहे. पंढरपूर तालुक्यात मतदार नोंदणीला दिनांक ३० सप्टेंबर २०२५ पासून प्रारंभ झालेला असून, अधिकाधिक पात्र मतदारांनी मतदार यादीत नांव नोंदवावे, असे आवाहन पदनिर्देशीत अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

पदवीधर व शिक्षक या दोन मतदारसंघाची नव्याने मतदार यादी तयार करण्याकरीता दि. ०१ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत मतदार नोंदणीचा कार्यक्रम जाहीर झालेला आहे. पंढरपूर तालुक्यात शिक्षक मतदारसंघाकरीता ०८ मतदान केंद्रामध्ये पंढरपूर शहर ०२, पुळूज, करकंब, पट. कुरोली, कासेगाव, भाळवणी, तुंगत येथे प्रत्येकी ०१ व पदवीधर मतदारसंघाकरीता १२ मतदान केंद्रामध्ये पंढरपूर शहर येथे ०५, करकंब येथे ०२, पुळूज, पट. कुरोली, कासेगाव, भाळवणी, तुंगत येथे प्रत्येकी ०१ केंद्र याप्रमाणे अशी एकूण २० प्रारूप मतदान केंद्रे तयार करण्यात आलेली आहेत.

पदवीधर मतदारसंघाकरीता मतदार नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक १८ हा फॉर्म आणि शिक्षक मतदारसंघाकरीता मतदार नोंदणीसाठी अर्ज नमुना क्रमांक १९ हा पात्र मतदारांनी भरून दयायचा आहे. पदवीधर मतदार नोंदणीकरीता ऑनलाईन अर्ज करण्यासाठी https://mahaelection.gov.in ही लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मतदार नोंदणीकरीता एकूण ०७ पदनिर्देशीत अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

मतदार नोंदणी ०६ नोव्हेंबर २०२५ या तारखेपुर्वी दोन्ही मतदारसंघाकरीता पात्र मतदारांनी नांव नोंदवावे, असे आवाहनही पदनिर्देशीत अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी केले आहे.

---

# आधार कार्ड अपडेटसाठी विद्यार्थ्यांकडून आकारली जाणारी अवाजवी फी थांबवावी, त्या शासन निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अहिल्यानगर प्रतिनिधी/बाळासाहेब अहिरे : अहिल्यानगर - जिल्ह्यातील विविध णखऊख केंद्रांवरून ५ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांचे आधार कार्ड बायोमेट्रिक अपडेट करताना शासनाच्या नियमावलीकडे दुर्लक्ष करून विद्यार्थ्यांकडून १०० रुपये किंवा त्यापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. प्रत्यक्षात ५ ते ७ वर्षे आणि १५ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांचे अनिवार्य बायोमेट्रिक अपडेट मोफत असणे आवश्यक आहे.या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश रघुनाथ साठे यांनी जिल्हाधिकारी पंकज आशियाना यांना निवेदन दिले आहे. यात संबंधित सर्व णखऊख सेंटरला शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांकडून पैशांची अवाजवी वसुली करणाऱ्या केंद्र चालकांवर कायदेशीर कारवाई करावी आणि त्यांचा परवाना रद्द करावा, अशीही मागणी

### वंचित बहुजन आघाडीची मागणी

दिलेले निवेदनात करण्यात आली आहे. पत्रकारांच्या माध्यमातून जिल्हाध्यक्ष योगेश साठे यांनी आवाहन केले की,जो कोणी ५ते१७ वयोगटातील विद्यार्थ्यांकडून आधार कार्ड अपडेट करण्यासाठी पैसे आकारील त्याची पावतीसह तक्रार जिल्हाधिकारी कार्यालय येथे करावी किंवा वंचित बहुजन आघाडीच्या कार्यकर्त्यांकडे करावी असे आवाहन केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष योगेश साठे, जिल्हा महासचिव प्रसाद भिवसने, भिंगार शहराध्यक्ष राजीव भिंगारदिवे, जिल्हा संघटक सुधीर ठोंबे, शहराध्यक्ष हनीफ शेख, जिल्हा सल्लागार जे डी शिरसाठ, नगर तालुकाध्यक्ष रविकिरण जाधव, युवा शहराध्यक्ष ॲड.योगेश गुंजाळ, प्रवीण ओरे, गणेश राऊत,सुरेश पानपाटील, फिरोज पठाण, बुद्धभूषण भिवसने,अजित कुऱ्हाडे, संकेत शिंदे, कौशिक गाडे, देविदास भालेराव, मनोज साळवे, गोविंद आठवले, शिवशंकर कठमोर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



---

**हडप केलेल्या रकमेची वसुली करण्याची मागणी**

**नरेगातून मिळणारे एकूण रकमावर परस्परच डल्ला**

# बासलेगावचे रोजगार सेवक जमादार त्यांच्याच कुटुंबातील व नातेवाईकांचे नावे टाकून परस्पर बिल हडप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थ्यांना रोजगार हमी योजनेतून मिळणारे रक्कम बासलेगावचे रोजगार सेवक श्रीशैल जमादार यांनी त्यांच्याच कुटुंबातील लोकांचे नावे दाखवून घरकुल लाभार्थ्यांचे लाखो रुपये लुटला आहे.यामुळे तालुक्यात एकच खळबळ माजली आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्व सामान्यांसाठी हक्काचे घर मिळावे या हेतूने प्रधानमंत्री घरकुल आवास योजना तळागाळातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहचविण्याचे कार्य राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या माध्यमातून तालुक्यात असंख्य वंचित गरीब घटकांना घरकुल योजना मिळत आहेत, मात्र बासलेगाव येथील घरकुल योजनेच्या अनुदानामध्ये रोजगार सेवक हे स्वतःच्या घरातील नावे लावून लाखो रुपयांचा चुना घरकुल लाभार्थ्यांना लावला आहे.



**बासलेगाव च्या रोजगार सेवकाची चौकशी केली असता. ग्रामसेवक श्रीशैल जमादार यांना काढून टाकण्याचा ग्रामसभेत सर्वानुमते ठराव घेण्यात आला आहे.त्यानुसार त्यांच्यावर कारवाई केली जाईल.**

**शंकर कवितके (गटविकास अधिकारी पं.स. अक्कलकोट)**

बासलेगाव येथे सुमारे पन्नासहून अधिक घरकुल मंजूर असून, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत घरकुल मंजूर असलेल्या बांधकामांवर कामांकरिता उपस्थिती दाखवून गोर गरिबांचे हजारो रुपये लुटत आहेत. इ मस्टर मनरेगाच्या अनुदानामध्ये एखाद्या कुटुंबातील नांवे दिली असता ती नावे न लावता स्वतः च्या कुटुंबातील नातेवाईकांतील व ओळखीच्या एखाद्या व्यक्तीच्या नावे दाखवून नरेगातून मिळणारे एकूण रकमावर परस्परच डल्ला मारला आहे.

**सदरील प्रकाराबाबत रोजगार सेवक श्रीशैल जमादार यांची चौकशी केली असता याबाबत त्यांनी सोमवार च्या ग्रामसभेत बाजू मांडणार असल्याचे मला सांगितले आहे.परंतु त्या सोमवारच्या बैठकीस येण्यास टाळाटाळ केली आहे.**

**बिरप्पा बंदीछोडे (सरपंच बासलेगाव)**

घरकुल बांधण्यासाठी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून २७ हजार रुपये जाब कार्ड मजुरांना मिळतो.घरकुल बांधणाऱ्या लाभार्थ्यांनी त्यांच्या कुटुंबातील नावे दिले. परंतु त्या लाभार्थ्यांनी दिलेली नावे, इ मस्टर मध्ये न टाकता रोजगार सेवकांनी त्यांच्याच कुटुंबातील व नातेवाईकांचे नावे टाकून परस्पर बिल हडप केले आहे.सदर प्रकरणाची लवकरात लवकर चौकशी करून हडप केलेल्या रकमेची वसुली करण्याची मागणी त्या गावातील लाभार्थ्यांनी गट विकास अधिकारी पंचायत समिती अक्कलकोट यांच्याकडे केली आहे.



**घरकुल लाभार्थ्यांना मिळणाऱ्या रकमेपासून उपासी, ठेवणाऱ्या रोजगार सेवकांची सखोल चौकशी करून योग्य ती कारवाई करावी व लाभार्थ्यांची रक्कम वसुली करून संबंधित त्या लाभार्थ्यांना देण्यात यावे.**

**- लखन राठोड (बासलेगांव)**

---

# सिद्धार्थ साळवे वर पिस्तूलने हल्ला जळगांव फाटा येथे गोळीबार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी :निफाड तालुक्यातील जळगाव फाटा येथे जुन्या वादातून सुंदरपूर येथील सिद्धार्थ साळवे नावाच्या युवकावर विशाल केडाळे, पृथ्वी जाधव, मयूर ढगे, बाळा बर्डे, विजय शिंदे या संशयित आरोपींनी गावठी पिस्तेल मधून तीन गोळ्या झाडल्या जखमी युवक थोडक्यात बचावला,,,, जखमी युवकाच्या खांद्याला व पोटाला दोन्ही गोळ्या चाटून गेल्याने किरकोळ जखमा झाल्या,,, निफाड, काथरगाव येथील युवकांनी जीव घेणा प्रयत्न केला असून संशयित आरोपी घटनास्थळावरून फरार झाले होते.

### हल्ल्याातील सर्व फरार आरोपींना अटक; एसपी बाळासाहेब पाटील पथकाची कामगिरी

सदर गुन्हा निफाड पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडला आहे. नाशिक जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांचे पथक व स्थानिक गुन्हे शाखेचे रवींद्र मगर उपविभागीय पोलीस अधिकारी कांतीलाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलीस निरीक्षक गणेश गुरव सह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस कर्मचारी तसेच निफाड पोलिस नाईक नितीन सांगळे, हवालदार अनिल शेरेकर, हवालदार कपालेश्वर ढिकले, विनोद जाधव धनंजय जाधव, राजेंद्र दरोडे, अरविंद ढवळे, योगेश आव्हाड सागर सानप भास्कर पवार योगेश खर्जे मनीषा गायकवाड फरार आरोपींचा शोध घेत सर्व आरोपींना अटक करण्यात यश मिळाले.

# श्री स्वामी समर्थ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे अल्पमुदत अभ्यासक्रमाचे उद्घाटन समारंभ



## राज्यातील सर्व आयटीआयमध्ये अल्पमुदतीचे रोजगारक्षम कार्यक्रमाचे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
अक्कलकोट/प्रतिनिधी : शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था अक्कलकोट येथे अल्पमुदत अभ्यासक्रमाचे उद्घाटन सोहळा संपन्न झाला उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी आयएमसी चेअरमन श्री राजशेखर हिपरगी यांनी भूषवले व कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासनातर्फे राज्यातील सर्व आयटीआय मध्ये अल्पमुदतीचे रोजगारक्षम कार्यक्रमाचे उद्घाटन आभासीपद्धतीने देशाचे पंतप्रधान आदरणीय नरेंद्रजी मोदी यांचे हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार श्री सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले प्रास्ताविकामध्ये संस्थेचे गट निदेशक श्री गणेश काशीद सर यांनी या संस्थेमध्ये चालू होणारे दोन कोर्सेसची माहिती दिली आणि कमी वेळामध्ये स्किल डेव्हलप करून स्वयंरोजगार करण्याचा मुख्य उद्देश या कोर्सेसचा आहे अशी माहिती दिली या संस्थेमध्ये इलेक्ट्रिशियन डोमेस्टिक सोल्युशन आणि सेल्फ एम्प्लॉयमेंट टेलर हे दोन कोर्सेस ना वरिष्ठ कार्यालयाकडून परवानगी मिळाल्याची माहिती श्री काशीद सर यांनी दिली. यानंतर अक्कलकोट विधानसभा सदस्य आमदार श्री सचिन कल्याणशेट्टी यांचे सत्कार श्री काशीद सरांच्या हस्ते करण्यात आला आणि आयएमसी अध्यक्ष श्री राजशेखर हिपरगी यांचे सत्कार संस्थेचे जेष्ठ निदेशक श्री नदाफ सर यांच्या हस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे पीएम विश्वकर्मा लाभार्थी श्री भागवत सुतार यांचा सत्कार आमदार कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला त्याचप्रमाणे आयएमसी सदस्य श्री कमलाकर सोनकांबळे श्री शिवशंकर स्वामी उद्योजक श्री मल्लिनाथ आळगी व विलास कोरे यांचा संस्थेतर्फे सत्कार करण्यात आला मार्गदर्शन करत आमदार कल्याणशेट्टी म्हणाले की, आयटीआयच्या कौशल्याचे गुपित सांगितले कुठलेही वस्तू कुठलाही जॉब बनवण्यासाठी पहिल्यांदा आयटीआय टेक्निशियन लागतो त्याचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले मुलांनी अभ्यास करून चांगले मार्क मिळवावेत व कमी वेळामध्ये आपल्याला रोजगार प्राप्त होतो याची जाणीव विद्यार्थ्यांना करून दिली अध्यक्षीय भाषणामध्ये आयएमसी चेअरमन श्री राजशेखर हिपरगी यांनी सर्व प्रवेशित मुलांचे अभिनंदन केले व त्यांना भविष्याच्या शुभेच्छा दिल्या त्यानंतर आमदार साहेब यांच्या हस्ते इलेक्ट्रिशन विभागामध्ये इलेक्ट्रिशियन डोमेस्टिक सोल्युशन आणि ड्रेस मेकिंग विभागांमध्ये सेल्फ एम्प्लॉयमेंट टेलर या अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचे फीत कापून उद्घाटन केले व या कोर्सेसची माहिती त्यांनी घेतली सदर कार्यक्रमांमध्ये संस्थेचे श्री घोडके सर भोंगाळे सर बगले सर वाघमारे सर लिंबे सर गवल मॅडम स्वामी सर बिराजदार सर कोणापुरे सर व सर्व कर्मचारी वृंद व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर उद्घाटन सोहळ्याचे सूत्रसंचालन संस्थेचे शिल्प निदेशक श्री दिनेश मंठाळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री एमजी नदाफ सर यांनी केले.







# खडवली फाटा येथे कचऱ्याचे ढीग; नागरिकांचे आरोग्य धोक्यात, प्रवाशांचा जीव मुठीत



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : नाशिक महामार्गावर पडघा परिसरातील खडवली फाटा येथे कचऱ्याचे भयानक साम्राज्य निर्माण झाले असून नागरिक आणि प्रवाशांचे आरोग्य गंभीर धोक्यात आले आहे. प्लास्टिकपासून कुजलेल्या मांसापर्यंत सर्व प्रकारचा घनकचरा रस्त्याच्या कडेला साचलेला असून, हा कचरा वारंवार महामार्गावर पसरतो. त्यामुळे दुर्गंधी, कीटकांचा उपद्रव, तसेच अपघातांचा धोका वाढला आहे. या कचऱ्यात चहाचे रिकामे कप, खराब पालेभाज्या, प्लास्टिक बॉटल, कॅरीबॅग, खराब कपडे, रिकामी खोकी, कोंबड्यांची पिसे, कुजलेले मांस, माशांची घाण आणि गुटख्याच्या पुड्या अशा वस्तूंचा समावेश असून संपूर्ण परिसरात असह्य दुर्गंधी पसरली आहे. महामार्गावरून रोज शेकडो वाहने ये-जा करतात, मात्र कचऱ्याची कोणतीच कायम स्वरूपी विल्हेवाट लावली जात नाही. कचऱ्याला जेसीबीच्या सहाय्याने मागे ढकलले जाते, पण काही दिवसांत पुन्हा तीच स्थिती निर्माण होते. त्यामुळे नागरिक आणि प्रवासी त्रस्त झाले आहेत. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, असा घनकचरा संसर्गजन्य आजार, विषबाधा, श्वसनाचे विकार आणि पर्यावरणीय प्रदूषणाला कारणीभूत ठरू शकतो. स्थानिक नागरिकांचा सवाल आहे की, महामार्ग स्वच्छतेसाठी लाखो रुपये खर्च होतात, पण प्रत्यक्षात कचरा हटवला जात नाही; मग हा निधी नेमका कुठे जातो? दरम्यान, पडघा टोल नाका प्रशासन व ग्राम पंचायत यांच्या निष्क्रियतेमुळे परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत आहे. नाशिक महामार्गावरील खडवली फाटा परिसरातील कचऱ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी पडघा ग्रामपंचायत व पडघा टोल व्यवस्थापन तातडीने पुढाकार घेईल का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**दुर्गंधी, रोगराई आणि अपघातांचा वाढला धोका**

**महामार्गावरून मी रोज प्रवास करतो. रस्त्यावर आलेल्या कचऱ्यामुळे गाडी चालवताना अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्हाला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी.**
**– साईनाथ पांडव (प्रवासी)**

# रेखा गणपती भोसले यांची सारोळा ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी निवड

औसा प्रतिनिधी/अमर जाधव
औसा तालुक्यातील सारोळा ग्राम पंचायतच्या उपसरपंच पदी रेखा गणपती भोसले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली .सारोळा येथील उपसरपंच रेखा भोसले यांनी गावातील महिला सक्षमिकरण .व बचत गट महिला सह गावातील महिलांच्या अडीअडचणी जाणुन घेउन एक महिला प्रतिनीधी मनुन येणार्या काळात ग्रामपंचायत च्या माध्यमातुन महिलांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मी प्रयत्न करणार असुन .जनतेने निवडणुकीत दिलेले भरपुर मतदान रुपी आशिर्वाद यामुळेच मला उपसरपंच मनुन काम करण्याची संधि मीळाली असुन येणार्या काळात मीळालेल्या संधिचे सोन करत



मी सारोळा ग्रामस्थांची सेवा करण्याचा माझा पुरेपुर प्रयत्न असल्याच उपसरपंच रेखा भोसले यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना सांगीतले निवडीवेळी सरपंच समाधान वसंतराव पाटील . ग्रामसेवक काळे गुरुलिंग स्वामी .महमद पठान ..गौतम लोखंडे.सुजाता शिंदे,संगिता साळुंके.अश्विनी लोखंडे.राहुल साळुंके. राजश्री सातपुते.शिवपुत्र स्वामी .पंडीत साळुंके.श्रीधर साळुंके .गौतम साळुंके. अच्युत साळुंके.संतोष जाधव ,नागनाथ डुकरे .प्रदिप साळुंके.वामन साळुंके.भगवान मुळे .राजेसाहेब साळुंके.धोंडीराम पाटील .शिवाजी साळुंके.प्रतिभा साळुंके.सुवर्णा साळुंके.कल्पना स्वामी .वैशाली साळुंके. संजीवनी जाधव .सह सारोळा ग्रामस्थांनी निवडीबद्धल अभिनंदन केले .

# तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत टी. ए. पाटील इंग्रजी शाळेचे यश

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील शालेय शासकीय मैदानी तालुका क्रीडा स्पर्धा भिवंडी तालुक्यातील ऑल सेंट हायस्कूल भावाळे येथे पार पडली.

यावेळी तालुक्यातील टी. ए. पाटील इंग्रजी मिडियम मधील १४ ते १७ वयोगटातील विद्यार्थ्यांनी लक्षवेधी यश मिळविले आहे.




तालुक्यातील येथे तालुका स्तरीय शाळा शासकीय तालुका क्रीडा स्पर्धा पार पडली. त्यात टी. ए. पाटील इंग्रजी शाळेतील कु.हर्ष सोमनाथ पाटील याने लांब उडी, शंभर मीटर हडळ रन मध्ये प्रथम क्रमांक मिळवला, कु. अद्वेत अमोल जाधव याने शंभर मीटर रनिंग मध्ये प्रथम क्रमांक मिळवला, कु.मनस्वी किरण गवाले हिने लांब उडी मध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. या तिन्ही विद्यार्थ्यांनी तालुका स्तरावर यश मिळवले असून त्यांची जिल्हा स्तरीय क्रीडा स्पर्धेत निवड करण्यात आली आहे. यावेळी विद्यार्थ्यांना क्रीडा शिक्षिका नीता वारघडे यांनी मार्गदर्शन केले. त्याच्या पुढील वाटचालीसाठी संस्थेचे संचालक मंडळ, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी पुढील स्पर्धेसाठी विद्यार्थ्याला शुभेच्छा दिल्या आहेत. अतिशय मेहनत, चिकाटी व प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाने या विद्यार्थाने यश संपादन केले असून त्याच्यावर सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

**नागरीक २५ वर्षांपासून उद्धघाटन केलेल्या आश्वासनवरच**

**जीव मुठीत धरून करावा लागतो प्रवास**

# अनेक वर्षापासून दरेगाव येथील बौद्ध व मुस्लिम वस्तीत जाण्यासाठी नाल्यावर कॉँक्रीट पुल प्रतिक्षेतच







**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
दैनिक यश सिध्दि न्युज नेटवर्क

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

सिंदखेडराजा तालुक्यातील दरेगाव येथे गावात जाण्यासाठी मुख्य दोन मार्ग आहेत. एक सरळ गावात जाण्यासाठी आहे व दुसरा बौद्ध . मुस्लिम व काही वंजारी समाज हि वास्तव्यास आहेत.अनेक वर्षांपासून बौद्ध मुस्लिम वंजारी वस्तीत जाणारा हा मुख्य रस्त्या आहे. कितेक वर्षे व राजकीय नेत्यांच्या अनेक पंचवार्षिक ओलांडून गेल्या आहेत. निवडणूका आल्यानंतर समाजाला भुलथापा व आश्वासन देऊन. मतदान घेऊन विजयी झाले . कोणी सरपंच . पंचायत समिती सदस्य.जिल्हा परीषद सदस्य .कोणी आमदार मंत्री सुध्दा झाले . निवडणूका झाल्यानंतर निकाल ही लागला विजयी झाल्यानंतर . सरपंचाला बोलल्यानंतर सरपंच पंचायत समिती सदस्या ना बोलतात . पंचायत समिती सदस्य जिल्हा परिषद सदस्या ना बोलतात मग वेळ येते त्याच बौद्ध मुस्लिम वंजारी वस्तीत जाण्यासाठी नाल्यावर कॉँक्रीट पुल बांधून देण्याची वेळ . मंग तोच पायंडा वेळ येते उद्घाटनाची. उद्धघाटनाचा मुहूर्त ठरतो आणि उद्घाटन होऊन जाते. गावच्या सरपंचा पासून ते जिल्हा परीषद सदस्या पर्यंत ह्या नाल्यावर किमान एक पोत भर नारळ फुटले असतील. आजही तो नाला २५ वर्षांपासून जश्याचा तसा असून .पावसाळा थांबला नाल्यातील पाणी बंद झाल्यावर ग्रामपंचायत कडून दगड मुरमाचा भरवा केला जातो.व पुन्हा रहदारी सुरू होऊन पावसाळा सुरू झाला की तेच रडगाणे कुठपर्यंत सुरूच राहणार असल्याचे बौद्ध मुस्लिम वंजारी समाजाच्या नागरिकांना त्या नाल्यातून पावसाळ्यात आपला जिव मुठीत धरून जावे लागते. बौद्ध समाजाला स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यासाठी त्याच नाल्यातून जावे लागते हिच मोठी शोकांतिका सोसावी लागत आहे. अनेक नेते होऊन गेले मात्र आश्वासन देऊनच गेले.

सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार मनोज भाऊ कायंदे यांनी २५ वर्षांपासून प्रलंबित असलेल्या बौद्ध, मुस्लिम, वंजारी वस्तीत जाणाऱ्यां नाल्यावर लक्ष केंद्रित करून कॉँक्रीट पुलाचे बांधकाम करुन देतील अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे. काते दिवस पुन्हा नागरिकांना पाहण्यास मिळणार येणारा काळच ठरवणार.